# डॉक्टर काय करतात? भाग-१



सर्दी, खोकला, ताप, डोकेदुखी, अपचन हे लहानसहान आजार आपल्याला नेहमी होतात.

सर्दी खोकल्यात घशाला सूज येते, म्हणून डॉक्टर घसा तपासतात.

अपचन व पोटातील इतर आजार जिभेच्या रंगावरून कळून येतात.

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई-४००००५.

प्रकाशक: इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
पुणे - ४११०२९.

डॉक्टर पोट दाबून बघतात.
पोटात गुबारा धरला असला, किंवा
कुठे सूज आली असेल तर
ते डॉक्टरना समजते.



काविळीत डोळे पिवळे पडतात.
अंगातील रक्त कमी झालं तर
डोळे फिक्कट होतात. डोळे तपासले
की डॉक्टरांना हे समजते.





डॉक्टर ताप मोजण्याची नळी काखेत लावतात. ताप किती आहे ते बघतात. विषमज्वराचा ताप लवकर उतरत नाही. हिवतापात थंडी वाजते. यांवरून ताप कसला आहे ते डॉक्टरांना ठरवता येते. म्हणून ताप येताना थंडी वाजते का, तापात चढ उतार आहे की नाही हे डॉक्टर विचारून घेतात.



काही रोग साध्या तपासणीवरून
नक्की समजत नाहीत.
मग डॉक्टर रक्त, थुंकी, लघवी,
तपासायला सांगतात.



विषमज्वर आणि हिवताप या
रोगाचे जंतू रक्तात असतात.
क्षय रोगाचे जंतू थुंकीत सापडतात.
छातीच्या फोटोतही क्षय आहे की
नाही हे समजते. हाडाला झालेली
इजा फोटोवरून चांगली समजते.
लघवी तपासली की मधुमेह, कावीळ
हे रोग समजून येतात.